केंद्र सरकारच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा- ना. प्रतापराव जाधव >> पान 2
इतिहासात पहिल्यांदाच पर्यटकांवर हल्ला ही चिंतेची बाब : माजी खा. छत्रपती संभाजीराजे >> पान 3
राज्य महामार्गावरील शौचालयाच्या दयनीय अवस्था >> पान 4

**सुविचार**
आपले लक्ष आपल्या उद्दिष्टावर ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 257 ■ बुधवार, दि. 30 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




पुलं देशपांडेंच्या लेखणीतून अवतरलेलं सुंदर मी होणार ३० वर्षांनी रंगभूमीवर
आतील पान

# देशहित सर्वोपरी! पाकिस्तान सोबत व्यापार पूर्णत: बंद

**नवी दिल्ली : कॉन्फेड्रेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स म्हणजेच कॅट (सीएआयटी) ने पाकिस्तान सोबत तातडीने व्यापार थांबण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सरकार सह आता भारतीय व्यापारी ही पाकिस्तानची कोंडी करण्याच्या प्रक्रियेत सक्रीय झाले आहे. देशहित सर्वोपरी असून व्यापाराचे हित त्यानंतर येतं, असे सांगत कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी सी भरतीया यांनी पाकिस्तान सोबत आमचे सर्व सदस्य व्यापार थांबवत असल्याचे जाहीर केलं आहे. कॅटच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक नुकतीच भुवनेश्र्वर येथे पार पडली, त्यात हा निर्णय सर्वानुमते घेतल्याचा दावा बी सी भरतीया यांनी केला आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या अडचणी दिवसागणिक वाढत चालल्या असल्याचे पुढे आले आहे.**

## व्यापाऱ्यांच्या सर्वात मोठ्या सीएआयटी संघटनेचा मोठा निर्णय

पुढे आलेल्या माहितीनुसार, व्यापाऱ्यांनी पाकिस्तान सोबतचे व्यापार थांबविल्यामुळे पाकिस्तानला साखर, सिमेंट, लोह पोलाद, ऑटोमोबाइल्स पार्ट, टायर ट्यूब अशा वस्तूसाठी पाकिस्तानी व्यापारी आणि नागरिक तरसतील, असे भरतीया म्हणाले. दरम्यान भारताला ही पाकिस्तानमधून येणाऱ्या सुक्या मेव्याला मुकावे लागेल, मात्र आम्ही त्याविना राहू असे ही भरतीया म्हणाले. जोवर पाकिस्तानी व्यापारी आणि ग्राहक आपल्या सरकारवर दबाव आणून दहशतवादावर नियंत्रण आणण्यासाठी सांगत नाही, तोवर आम्ही पाकिस्तान सोबत व्यापार करणार नाही, असे ही कॅटने जाहीर केले आहे.

दरम्यान, इथून पुढे पाकिस्तानसोबत व्यापार करणार नाही, असा निर्णय व्यापाऱ्यांच्या सर्वात मोठं संघटन असलेल्या CAIT ने घेतला आहे.




यात देशभरात कॉन्फेड्रेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स म्हणजेच (सीएआयटी) सोबत जोडलेल्या छोट्या व्यापारी संघटनांची संख्या ४० हजार इतकी आहे. तर सीएआयटी सोबत जोडलेल्या चिल्लर व्यापाऱ्यांची संख्या तब्बल ९ कोटी इतकी आहे. पाकिस्तान सोबत व्यापार थांबवल्यामुळे पाकिस्तानला साखर, सिमेंट, लोह पोलाद, ऑटोमोबाईल पार्ट्स, रबरी टायर ट्यूब याला मुकावे लागेल. तर भारताला सुकामेवा मिळणार नाही. डव्हान्स म्हणून दिलेले काही कोटी रुपये मोडतील, मात्र आमची त्यासाठीची तयारी असल्याचे सीएआयटीचे म्हणणे आहे.

पर्यटकांना पून्हा आकर्षित करण्यासाठी श्रीनगरच्या 'डल लेक' मधील छोटे फळ विक्रेते पर्यटकाना मोफत फ्रूट देत आहे. पेहलगामच्या घटनेमुळे व्यवसाय पूर्ण ठप्प आहे. इथे पर्यटक आले पाहिजे. त्यासाठी सध्या होत असलेले नुकसानही स्विकारायला आम्ही तयार आहोत, अशी प्रतिक्रिया त्या फळ विक्रेत्याने दिली.

# राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण

## टोल नाक्यावर सूट देणार, सुधारित पीक विमा लागू करणार; राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात यापुढे सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्येही आणि टोलमध्येही सूट देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राज्यातील जहाज निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळात घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची माहिती दिली.**



पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या राज्यातील व्यक्तींच्या कुटुंबाला प्रत्येकी ५० लाखांची मदत करण्यात येणार आहे. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा आणि त्यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देणे हा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

राज्य सरकारने एक नव्या इलेक्टिक व्हेईकल पॉलिसीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये चार्जिंग स्टेशन्सची सुविधा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या खरेदीवर सबसिडी आणि काही प्रमाणात टोलवरही सूट देण्यात येणार आहे.

शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार आहे. त्यातून रोजगार निर्मिती होते. राज्यात तीन मोठे बंदर आहेत. >> पान २

# सर्वोच्च न्यायालयाचा आदेश; कॅबिनेटमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह माजी मंत्र्यांवरही गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अडचणी वाढल्या असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के यांच्यासह ५४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. साखर कारखाना कर्जमाफी प्रकरणात ९ कोटींच्या अपहार प्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे.



शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप मंत्री महोदयांवर ठेवण्यात आला आहे. सन २००४ –२००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी प्रवरा कारखान्याचे सभासद बाळासाहेब केरूनाथ विखे यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर विखे पाटलांसह पाटलांसह ५४ जणांवर भादंस कलम ४१५,४२०,४६४, ४६५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**सर्वोच्च न्यायालयाने दिला आदेश**

राधाकृष्ण विखे पाटील हे राज्यातील वजनदार नेते असून कबिनेट मंत्री देखील आहेत. त्यामुळे, पोलीस स्टेशनने त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करून न घेतल्यामुळे तक्रारदार बाळासाहेब केरुनाथ विखे यांनी राहता येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात त्या अनुषंगाने फिर्याद दाखल केली. >> पान २

# गाव पाणीदार तर शेतकरी समृद्ध करणारा जलतारा प्रकल्प

## ध्येयवेड्या डॉ.पुरुषोत्तम वायाळ यांच्या प्रयोगाने पाणी टंचाईग्रस्त गाव झाले पाणीदार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा : जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी गत काही वर्षापासून विविध समस्यांनी ग्रासला आहे. परिणामी, शेतकऱ्यांमध्ये नैराश निर्माण झालं आहे.कधी अतिवृष्टी तर, कधी पाणीटंचाई अशा नैसर्गिक संकट आल्याने शेतकरी हतबल झाला आहे. शेतकऱ्यांना या दोन मुख्य समस्यातून बाहेर काढण्यासाठी जालना जिल्ह्यातील ध्येयवेड्या डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा हा अभिनव प्रकल्प राबवून शेतीत खऱ्या अर्थाने समृद्धी आणली आहे.जलतारा प्रकल्पातून जमिनीच्या भूगर्भात पाणी मोठ्या प्रमाणात मुरले जात असल्याने परिसर पाणीदार झाला आहे.तर, चिभड्या जमिनी सुद्धा सुपीक झाल्याने शेतकरी वर्ग ही समृद्ध झाला आहे. आज संपूर्ण राज्यात कमी अधिक प्रमाणात जलतारा प्रकल्प शासनाच्या वतीने राबविल्या जात आहे. या प्रकल्पाला शासन स्तरावरून मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळावे, जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात हा प्रकल्प राबवावा अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.**

जालना जिल्ह्यातील वाटुर येथील जलताराचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी सुरुवातीला स्वत:च्या ५० एकर शेतामध्ये चार बाय चार फूट रुंद व सहा फूट खोल असे शोष खड्डे घेत त्या त्यामध्ये दगड भरले. आणि पावसाचे पडलेले पाणी या शोष खड्ड्याच्या माध्यमातून जमिनीच्या भूगर्भामध्ये मुरविण्यात आले. एका वर्षातच या जलताराचा चमत्कार त्यांना दिसून आला.त्यानंतर त्यांनी सुरुवातीला चार गावांमध्ये जलतारा प्रकल्प राबविला. त्यानंतर ५० गावांमध्ये जलतारा प्रकल्प राबवला परिसरातील दोनशे ते अडीचशे गावांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे. याचा अल्पावधीतच परिणाम शेतकऱ्यांना दिसून आला आहे.एका शोष खड्ड्यामध्ये एका वर्षात तीन लाख ६० हजार लीटर पाणी जमिनीच्या भूगर्भामध्ये मुरले जात असल्याने पाणी पातळीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचबरोबर जमिनीची सोपीकता ही वाढली आहे. विशेष म्हणजे कोणतेही खर्चिक बाब न करता. ना धरण, ना नदी असे असतानाही परिसर पाणीदार करण्याची किमया या ध्येयवेड्या डॉ. पुरुषोत्तम वायाळ या जलतज्ञांनी केली आहे. जलतारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी खर्चाचा आणि फायद्याचा ठरला आहे. त्यामुळे अवघ्या काही वर्षातच जलतरा प्रकल्प हा संपूर्ण महाराष्ट्रात शासन स्तरावर राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.जलतारा प्रकल्पामुळे पाणीटंचाईत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. तर, जमिनीतील पाणी पातळी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.जमिनीची सुपीकता वाढली परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक उपलब्ध झाली. सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यामध्ये अतिवृष्टी होते आणि त्यामुळे जमीन चिपळूण जाते जमिनीची सुपीकता ही तीन प्रकारची आहे. त्यामध्ये लाईन ट्रीटमेंट, माथा ते पायथा व पाणलोट अशा तीन माध्यमातून भूगर्भात पाणी मुरवण्याचे काम केले जाते. जलताराच्या माध्यमातून जमिनीत पाणी मुरावे यासाठी चार बाय चार फूट रुंद व सहा फूट खोलीचे खड्डे खोदून








देविदास खनपटे
मुख्य संपादक

**जलतारा भाग १**

जलतारा प्रकल्प राबविण्यास प्रारंभ केला. परिणामी अल्पावधीतच पाणी पातळीत प्रचंड वाढ झाली. पाणी निचरा झाल्याने जमिनीची सुपीकता वाढली. त्यामुळे जलतरा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी समृद्धीचा मार्ग ठरला आहे. अशी माहिती जलताराचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी दिली आहे. तर, सदर प्रकल्पात च्या माध्यमातून आतापर्यंत १६० गावात जलतरा प्रकल्प राबविले असून ८६ हजार शोष खड्डे तयार करून जमिनीत पाणी भरवण्यात आले आहे. चार लाख एकर जमीन ओलीताखाली आणण्याची किमया ही जलतारा जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी केली आहे. मेहकर तालुक्यातील भीषण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासन स्तरावर जलतारा प्रकल्प मोठ्या ताकतीनिशी राबवावा, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

## सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री–पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ–कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री– पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री–पुरुष, जात–पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

# केंद्र सरकारच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा– ना. प्रतापराव जाधव

### – 'दिशा' समितीची बैठक संपन्न – पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री तथा 'दिशा' समितीचे अध्यक्ष ना. प्रतापराव जाधव यांनी आज विभाग प्रमुखांना दिले.

बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी मंगळवारी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार ना. प्रतापराव जाधव हे होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, प्रकल्प अधिकारी राजेश इंगळे यांच्यासह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.






बैठकीच्या सुरुवातीला जम्मू व काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृतकांना मौन बाळगून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचा आढावा घेतला.

यावेळी सिंचन प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन आणि भूसंपादन प्रक्रियेची माहिती घेतली. यात भूसंपादन प्रक्रियेबद्दल लोकांच्या तक्रारींचे निराकरण करावे. प्रकल्पबाधीतांना योग्य मोबदला मिळाला पाहिजेत. बुडीत क्षेत्रातील बाधीतांचे ज्या ठिकाणी पुनर्वसन केले जात आहे त्या ठिकाणी रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधा असाव्यात. जागा हस्तांतरणाचे प्रस्ताव निकाली काढावे. यासह जिगांव सिंचन प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे. पुनर्वसन गावांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी करण्याचे निर्देश ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेतला. २०२३–२४ वर्षात खरीप आणि रब्बी हंगामांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ५० हजार शेतकऱ्यांना ४५३ कोटी रुपये रक्कमेचा पीक विमा मंजूर झाला होता. त्यातील ४२९ कोटी रुपये वितरित करण्यात आले असून उर्वरीत २४ कोटी रुपये शेतकऱ्यांचे खाते आधार लिंक व इतर कारणांमुळे जमा झाले नव्हते ती नुकसान भरपाई देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. या शिवाय सन २०२४–२५ च्या खरीप हंगामात १४४ कोटी रुपये पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून उर्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यात पीक पैसे जमा होणार आहेत. असल्याची माहिती कृषी विभागाने दिली. त्याबाबत ई–केवायसी अभावी या योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना संपर्क करावे. प्रशासनाने शेतकऱ्यांना पीक विमा योजना समजावून सांगाव्या. यासोबत, गावनिहाय भेटी देवून कृषी योजनांची माहिती व त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत ई–केवायसी करतांना येणाऱ्या अडचणी सोडवा. अडचणी असलेल्या शेतकऱ्यांना योग्य माग्रदर्शन करा त्यांचे प्रश्न सोडवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी दिले.

#### शेतरस्ते, पाणंद रस्त्यांसाठी कृती आराखडा तयार करा

ग्रामीण भागातील शेतरस्ते, पाणंद रस्त्यासाठी कृती आराखडा तयार करावा. या आराखड्यात शेतकऱ्यांच्या मागण्यांचा समावेश करण्याच्या सूचना बीडीओंनी प्रत्येक ग्रामसेवकाला द्याव्यात, असे निर्देशही ना. जाधव यांनी दिले.

या बैठकीत ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री सुर्यघर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मनरेगा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, १५ वा केंद्रीय वित्त आयोग, गृहनिर्माण योजना, जलजीवन मिशन, अटल भूजल योजना, मजीप्रा, पाणी टंचाई निवारनार्थ उपयोजना, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, कौशल्य विकास योजना, पीएम श्री शाळा, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे प्रकल्प, नगरपरिषदेच्या योजना, नवीन शैक्षणिक प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.

### नवी मुंबई गुन्हे शाखेकडून आंतरराष्ट्रीय

# ड्रग्सच मोठ रॅकेट उध्वस्त

### दोन पोलीस कर्मचारी व कस्टम अधिकाऱ्यासह दहा जणांना अटक

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबईच्या एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे बांधकाम व्यावसायिक गुरुनाथ चिचकर यांच्या आत्महत्येने नवी मुंबईत खळबळ उडवली आहे. चिचकर यांनी शुक्रवारी स्वतःवर गोळी झाडून आपले जीवन संपवले. त्यांच्या सुसाईड नोटमध्ये नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकाऱ्यांवर त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला होता.. या गंभीर आरोपांची दखल घेत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केलेअधिक चौकशी केली असता यामध्ये दोन पोलीस हवालदारांसह दहा जणांना अटक केली आहे.

थायलंडसह, परदेशातून या ड्रग्स प्रकरणातील माल मागवत असून मुंबईसह नवी मुंबईमध्ये आणल जात होता. त्यानंतर सर्व ठिकाणी पाठवलं जात होत. तसेच या कारवाईमध्ये २ लाख ७६ हजार ५०० रुपये किमतीचा हायड्रो गांजा जप्त करण्यात आला आहे. तर ७३ लाख ९३ हजार रुपयांचा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.. या संदर्भात नेरुळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात खारघर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कर्मचारी सचिन भालेराव याचा सतत गुरुनाथ चिचकर यांच्याशी संपर्क असल्याचे समोर आले. तपासाचा अंदाज लागताच भालेराव



आपल्या मूळ गावी पळून गेला. मात्र नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला गावातून पकडले आहे.

यामध्ये पोलीस हवालदार सचिन भालेराव सोबत पोलीस हवालदार संजय फुलकर यांना देखील अटक करण्यात आली आहे .. तर कस्टम अधीक्षक प्रशांत गौर यांना देखील अटक केली असल्याची माहिती पोलीस यांनी दिली.

पान १ वरून...

### राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण

त्यातून व्यवसाय निर्माण होऊ शकते. त्या मुद्द्यावर एक पॉलिसी करण्यात आली आहे. राज्यात सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. १ रुपयात विमा योजनेत लाखो बोगस अर्ज आले. लोकांनी निधीचा अपव्यय करणारे षडयंत्र केले. त्यामुळे गरजू व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सुधारित योजना आणणार आहे. विमा कंपन्यांचा नव्हे तर शेतकऱ्यांचा लाभ व्हायला हवा. शेतकऱ्यांना मल्चिंग पेपर, ट्रॅक्टर, ट्रीप यामध्ये गुंतवणूक करणारी नवी योजना लागू केलेली आहे. आज ९ साईट्सवर पंप स्टोअरेजचे करार केले आहे. त्यामाध्यमातून ८००० ते ८५०० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. पंप स्टोरेजच्या क्षेत्रात जास्त निर्मिती करणारे राज्य महाराष्ट्र आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा आदेश;

येथील न्यायालयाने फिर्यादीची चौकशी करून सर्व संचालकांच्या विरुद्ध क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम १५६ /३ अन्वये गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सदरच्या आदेशाविरुद्ध विखे सहकारी साखर कारखानाच्या संचालकांनी उच्च न्यायालय खंडपीठात औरंगाबाद येथे दाद मागितली. याठिकाणी उच्च न्यायालयाने राहता येथील न्यायालयाचा आदेश अमान्य केला होता. त्यानंतर, बाळासाहेब विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. अखेर, सर्वोच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल ग्राह्य धरत विखे पाटील यांच्यसह ५४ जणांवर गुन्हा दाखल करुन चौकशीचे आदेश दिले आहेत.

# पुलं देशपांडेंच्या लेखणीतून अवतरलेलं सुंदर मी होणार ३० वर्षांनी रंगभूमीवर

### प्रसिद्ध मराठी अभिनेत्री साकारणार महत्त्वाची भूमिका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई /प्रतिनिधी :**मराठी रंगभूमीवरचा एक अविस्मरणीय ठेवा – पु. ल. देशपांडे यांचं सुंदर मी होणार हे नाटक तब्बल तीस वर्षांनंतर पुन्हा रंगभूमीवर येतंय. निमित्त आहे पुलंचा २५ वा स्मृतिदिन आणि त्यांच्या पत्नी, लेखिका सुनीताबाई देशपांडे यांचं जन्मशताब्दी वर्ष. या खास पर्वावर सादर होणाऱ्या नव्या प्रयोगात बेबीराजे ही महत्त्वाची भूमिका साकारतेय अभिनेत्री स्वानंदी टिकेकर.

स्वानंदी जवळपास तीन वर्षांनंतर व्यावसायिक मराठी रंगभूमीवर पुनरागमन करत आहे. याआधी १०३, डोंट वरी बी हॅपी सारख्या लोकप्रिय नाटकात झळकलेली ही अभिनेत्री, सध्या हिंदीतील महानगर के जुगनू आणि इंग्रजीत मिडल क्लास ड्रिम्स ऑफ समर नाईट या दोन नाटकांत भूमिका साकारत आहे. मात्र सुंदर मी होणारच्या निमित्ताने ती पुन्हा एकदा मराठी रंगभूमीकडे वळली आहे.

नाटकाबाबत बोलताना अभिनेत्री स्वानंदी टिकेकर म्हणते की, ''मला निर्माता आकाश भडसावळेचा फोन आला, आणि त्याने विचारलं नाटक करणार का? त्याचवेळी त्यानं या नाटकाचं नाव सांगितलं आणि मला वाटलं, इतकी सुंदर संहिता आणि तेही पुलंचं नाटक ( ) – मी नाही म्हणण्याचा विचारच करू शकले नाही'', असं स्वानंदी सांगते. पुलंच्या लेखणीबद्दल असलेला आदर आणि त्यांच्या नाट्यसंहितेची ताकद तिच्या शब्दांमधून सहज उमटत होती.

बेबीराजे ही व्यक्तिरेखा तिच्या अंतर्मनाच्या अगदी जवळची आहे. ही व्यक्तिरेखा थोडीशी बंडखोर, मतस्वातंत्र्य असलेली, आणि आत्मभान जपणारी आहे. म्हणजेच, आजच्या काळाशी पूर्णतः सुसंगत. ''बेबीराजे नेमकी माझ्यासारखी वाटते. तिची स्वतःची मतं आहेत. ती आपलं काहीतरी वेगळं शोधू पाहते. जे आपल्याला सहज मिळालंय, त्याच्या पलीकडेही काही आहे का? हे शोधणारी ती, म्हणूनच मला ही भूमिका फारच भावली,'' असं ती भावनिक स्वरात स्वानंदी टिकेकर म्हणाली.

पुलंच्या नाटकात काम करणं ही तिच्यासाठी केवळ कलात्मक संधी नाही, तर श्रद्धेचा अनुभव आहे. ''मी हे नाटक पाहिलं होतं, पण वाचलं नव्हतं. आणि आता पुलंच्या स्वतःच्या हातून लिहिलेल्या ओळी रंगमंचावर बोलता येणार आहेत, ही कल्पनाच खूप पवित्र वाटते,'' असेही ती नम्रतेने मान्य करते.

बेबीराजे ही केवळ एका घरातल्या मुलीची गोष्ट नाही – ती नव्या विचारांची, सामाजिक चौकटी मोडण्याच्या प्रयत्नांची गोष्ट आहे. आजची तरुणाई ज्या संघर्षांमधून स्वतःचं वेगळं स्थान शोधते, त्याच दिशेचा प्रवास या व्यक्तिरेखेचा आहे. म्हणूनच ही भूमिका नाकारणं तिच्यासाठी शक्यच नव्हतं.

या नाटकाचं दिग्दर्शन अनुभवी दिग्दर्शक राजेश देशपांडे करणार आहेत. देशपांडे यांनी यापूर्वीही पु. ल. देशपांडे यांचं ती फुलराणीचं दिग्दर्शन केलं आहे. त्याचबरोबर भाषाप्रभू वसंत कानेटकर यांचं हिमालयाची सावली याही नाटकांचं दिग्दर्शन करून त्यांनी कानिटकरी भाषेला न्याय दिला आहे. त्यांचा रंगभूमीवरील अनुभव सुंदर मी होणारच्या नव्या सादरीकरणात मोठा विश्वास निर्माण करतो.

नाटकाची निर्मिती करण देसाई आणि आकाश भडसावळे यांनी केली आहे. नाटकात स्वानंदी (बेबीराजे) सोबत आस्ताद काळे (संजय), श्रुजा प्रभुदेसाई (दीदीराजे) यांसारखे कसलेले कलाकार काम करत आहेत. त्यांच्या जोडीनं मुलगी झाली हो मालिकेतून घराघरात पोहोचलेला नवा आश्वासक चेहरा सृजन देशपांडे, श्रुती पाटील, निलेश दातार ही नट मंडळी साहाय्यक भूमिकांतून दिसणार आहेत. संगीताची जबाबदारी मिलिंद जोशी, नेपथ्य संदेश बेंद्रे, वेशभूषा मंगल केंकरे यांच्याकडे असून, व्यवस्थापनाची धुरा नितीन नाईक यांनी सांभाळली आहे.

नाटकाचा शुभारंभ पुलंच्या २५ व्या स्मृतीदिनी म्हणजेच गुरुवार १२ जून २०२५ या दिवशी पुण्यात आणि शुक्रवार १३ जून या दिवशी मुंबईत होणार आहे. विशेष म्हणजे नाटकातील अजून तीन महत्वाच्या व्यक्तीरेखा महाराज, डॉक्टर आणि सुरेश कोण साकारणार याबद्दल रसिकांमध्ये उत्कंठा आहे.

सुंदर मी होणार ही केवळ एका घराच्या चार भिंतींत घडणारी घटना नाही ती एका संपूर्ण युगाच्या मानसिकतेचा आरसा आहे. आणि त्या आरशात




'बेबीराजे'सारखी व्यक्तिरेखा उभी करताना स्वानंदी टिकेकर पुन्हा एकदा रंगभूमीवर तीव्रतेनं, सच्चेपणानं आणि सुंदरतेनं उमटेल असा विश्वास वाटतो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लैंगिक अत्याचार व सुरक्षेबाबत नवी मुंबई पोलिसांमार्फत शैक्षणिक संस्था, विद्यालयांना आदेश



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस परिमंडळ १ वाशी यांच्या मार्फत १० पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या शाळा/महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांचेकडून महाराष्ट्र शासनाव्दारे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता करावायचे उपाययोजनांबाबतच्या अमंलबजावणी करण्यासाठी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरीता शाळा/महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांचे थर्ड पार्टी ऑडीट करुन घेण्याच्या सूचना पोलीस उपयुक्त पंकज दहाणे यांनी दिल्या आहेत. वाशी येथे शाळा/महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य/मुख्याध्यापक/व्यवस्थापक यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता विद्यालयांमार्फत करण्यात येत असलेल्या उपययोजनांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेकरीता व लैंगीक अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्याकरीता सविस्तर मार्गदर्शन करुन शालेय व्यवस्थापन कमेटी व स्थानीक पोलीस ठाणे यांनी आपसात समन्वय ठेवून महाराष्ट्र शासनाव्दारे वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले.

### ठाणे पोलिसांनी केली सलमान खान या सोनसाखळी चोरट्याला अटक



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** एका रात्रीत ०४ महिलांच्या गळयातील सोनसाखळी चोरी करणाऱ्या सलमान फिरोज खान (२५) या सराईत चोरट्यास ठाणे शहर पोलिसांनी राजस्थान,अजमेर येथून अटक केली. तसेच ०९ गुन्हे उघडकीस आणताना एकूण १०० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात यश आले. तर सलमान याच्यावर यापूर्वी मुंबईत चार गुन्हे दाखल असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंग जाधव यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील ११ एप्रिल २०२५ रोजी नौपाडा, राबोडी, वर्तक नगर या पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच रात्री ०४ महिलांच्या गळयातील सोनसाखळी चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. याचा तपास करताना अटकेतील सलमान खान हा या गुन्ह्यानंतर राजस्थान अजमेर येथे पळून गेला होता. अशी माहिती ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यानुसारच त्याला अजमेर येथून २३ एप्रिल २०२५ रोजी अटक केली. तसेच वर्तकनगर, राबोडी, नौपाडा, कापूरबावडी, कासारवडवली, डोंबिवली आणि नारपोली या पोलीस ठाण्यातील ०९ गुन्हे उघडकीस आणून त्या गुन्ह्यातील १०० ग्रॅम वजनाचे १० लाखांचे ०५ मणी मंगळसुत्रे व ०५ सोन्याच्या चैन आणि ८० हजारांची गुन्हा करताना वापरलेली मोटार सायकल असा एकुण १० लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच त्याला ३० एप्रिल २०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या पथकाने केली.

### कोण आहेत लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा, ज्यांच्याकडे आहे मोठी जबाबदारी

नवी दिल्ली : लेफ्टनंट जनरल एमव्ही सुचेंद्र कुमार निवृत्त होत आहेत. यामुळे भारताच्या नॉर्दन आर्मी कमांडची जबाबदारी लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा हाती घेणार आहेत. नॉर्दन आर्मी कमांड ही जम्मू काश्मीर आणि लडाख तसेच सियाचीन येथील सर्व लष्करी कारवायांवर नियंत्रण ठेवते. पाकिस्तान आणि चीनच्या कारवायांना उत्तर देण्यासाठी याच कमांडकडून निर्देश दिले जातात. या कमांडचे कमांडर इन चीफ म्हणून लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा सूत्र हाती घेणार आहेत. शर्मा यांच्या नावाचा विचार नॉर्दन आर्मी कमांडचे प्रमुख म्हणून वरिष्ठ पातळीवर काही दिवसांपासून सुरू होता. अखेर जबाबदारी सोपवण्याचा औपचारिक निर्णय २८ एप्रिल रोजी घेण्यात आला. याआधी पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा हे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासोबत श्रीनगरला पोहोचले होते. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला होता.

# इतिहासात पहिल्यांदाच पर्यटकांवर हल्ला ही चिंतेची बाब : माजी खा. छत्रपती संभाजीराजे

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** पहलगाम मध्ये घडलेला विषय राजकारणाच्या पलीकडे आहे.या विषयात केंद्र सरकार घेईल त्या निर्णयासोबत देशातील प्रत्येक नागरिक असेल. हे सगळं कशामुळे घडलं याच्या खोलात जाऊन तपास करणं गरजेच आहे.गेल्या ७५ वर्षात इतिहासात पहिल्यांदाच पर्यटकांवर हल्ला झाला आहे.ही चिंतेची बाब असून, हे का आणि कशासाठी घडवलं याचा अभ्यास केंद्र सरकारने करावा. असे मत माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, पंतप्रधान देशाचे असतात, ते जो काही निर्णय घेतील त्यांच्यासोबत संपूर्ण देश असेल.अतिरेक्यांना सोडून देणं योग्य नाही, त्यांना शिक्षा व्हायला हवी. सरकारने पाकिस्तानबाबत अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. कोणीही काहीही बोलण्यापेक्षा सरकारची भूमिका काय आहे. त्याकडे लक्ष ठेवणं गरजेच आहे. आपण सर्व भारतीय लोक एक आहोत आणि एकसंघ आहोत. त्या अतिरेक्यांवर कठोर कारवाई कशी करता येईल, याकडे केंद्र सरकारने लक्ष द्यावे. विषय दुसरीकडे नेण्यापेक्षा तेथे काय घडले, याची तपासणी करायला हवी.या देशात जो राहतो तो प्रत्येक जण भारतीय आहे.आपण जेव्हा स्वतःला भारतीय समजतो तेव्हाच आपण भारतीय होतो. हा हल्ला एका कोणावर नाही तर भारतावर आहे. पाकिस्तान प्रमाणे आपले नेते देखील व्हूरचना आखत आहेत. वेगवेगळे देश आपल्याला कशा पद्धतीने पाठिंबा देतील, याकडे आपले नेते प्रयत्न करत आहेत. प्रत्येक पाच वर्षांनी अशा घटना घडत आहेत, मग अशा घटना



नुसता आम्ही सहन करत बसायचं का?? कोणताही बेकायदेशीर माणूस भारतामध्ये राहू शकत नाही. त्यांना काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांना सूचना असतील. मोगलांचा इतिहास अभ्यासक्रमातून काढला असेल तर, हे योग्य नाही. औरंगजेब कोण होता? ज्याला २७ वर्ष मराठ्यांचे साम्राज्य ताब्यात घेणं जमले नाही. त्याला मराठ्यांनी मातीत गाडले हा इतिहास आहे. इतिहासातलं हे पान फाडल्यास पुढच्या पिढीला हिंदवी स्वराज्याचा शत्रू कोण कसं कळणार? एवढा मोठा शत्रू होता, तरी देखील मराठे घाबरले नाहीत. हे इतिहासाच्या पानात यायलाच हवं या मताचा मी आहे. जे भारताचा झेंडा हातात घेतात त्या प्रत्येकाला येथे व्यवसायाचा आणि राहण्याचा अधिकार आहे. खोलात जाऊन तपास करण ही सरकारची जबाबदारी आहे.कॅबिनेट मंत्री आवाहन करत असल्यास त्यांचे मुख्य असलेल्या मुख्यमंत्र्यांनी त्यांना सांगावे. या गोष्टीमुळे राज्यातील वातावरण गढूळ होऊ नये, दोन धर्माबद्दल ध्रुवीकरण करण्याचं काम सोशल मीडियामुळे सुरू झाले, हे न परवडणारं आहे. जागतिक वारसा स्थळाचे अनेक फायदे आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी अद्याप मला बोलावलेलं नाही.मात्र, जागतिक वारसा स्थळामुळे किल्ल्यांचे ब्रँडिंग होते. सरकार किल्ले जागतिक वारसा स्थळात गेल्यास फंडिंग येईल असं भासवत आहे. मात्र, असं काहीही होत नाही. महाराष्ट्रातील किल्ले जागतिक वारसा स्थळांमध्ये आणण्याची जबाबदारी मी घेतली. जर जिल्हाधिकारी यांनी मला बोलावलं तर मी नक्की जाईन. रायगड प्राधिकरणचा अध्यक्ष म्हणून अमित शहा यांचा स्वागत करायला मला आवडले असते.छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळाने घेतलेल्या कार्यक्रमात मला निमंत्रित केलं नसल्याने माझा जायचा विषय नाही.ते रायगड किल्ला पाहायला आले असते. तर रायगड प्राधिकरणाचा अध्यक्ष म्हणून त्यांचा स्वागत करणं माझी जबाबदारी असती. मात्र, ते कार्यक्रमाला आले होते. ३१ मे पर्यंत किल्ल्यावरील अतिक्रमण हटाव मोहीम सरकारने घेतलेली आहे. वाघ्या कुत्रा हटवण्या संदर्भात मी अल्टिमेटम दिलेला नाही. दंतकथेतून निर्माण झालेला हा वाघ्या आहे. हा पुतळा काढण्यासाठी कमिटी स्थापन करावी लागेल. यासंदर्भात मी मुख्यमंत्र्यांना भेटलो आहे.तुकोजी होळकर महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीसाठी मदत केली होती. वाघ्या कुत्र्याच्या समाधीसाठी नाही. कुत्र्याची समाधी काढून उलट तिथे छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी बांधण्यासाठी ज्यांनी मदत केली त्यांचे सर्वांच नाव टाकावे, वाघ्या कुत्रा नव्हताच, तर तो उडी कसली मारणार. हा विषय मी पुन्हा घेणार आहे. असे मत माजी खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी व्यक्त केले.

# मुख्यमंत्र्यांनी शिंदे समितीचा अहवाल स्वीकारला तर राज्यभर आंदोलन

## लक्ष्मण हाके यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामपंचायत आरक्षणाची सोडत तसेच युपीएससी मध्ये मराठा समाजाला न्याय मिळत आहे. याबाबत जरांगे पाटील श्रेय घेत आहे. हे जर वास्तव आहे. तसेच न्यायमूर्ती शिंदे समितीच्या अहवालानुसार ८ लाख ओबीसी प्रमाणपत्राचे वाटप झाले असेल, तर निश्चितच दुर्दैवाने जरांगे पाटील यांचे महाराष्ट्रातील आंदोलन यशस्वी झाले आहे. अशी थेट कबुली ओबीसी नेते लक्षण हाके यांनी दिली आहे. पंढरपूर येथे ओबीसी नेते लक्षण हाके यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी हाके यांनी जरांगे पाटील यांचे आंदोलन यशस्वी झाल्याचे सांगत ओबीसी आंदोलनाबाबत हतबलता व्यक्त केली. तसेच मुख्यमंत्र्यांनी शिंदे समितीचा अहवाल स्वीकारला तर राज्यभर आंदोलन करण्यात येईल,



असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना लक्ष्मण नाके म्हणाले की, राज्यात मुख्यमंत्री कुणीही असो. पण सध्याच्या मुख्यमंत्री यांची जबाबदारी आहे. जर शिंदे समितीचा अहवाल स्वीकारला तर, ओबीसी आरक्षण संपले असे म्हणावे लागेल. आणि यांची जबाबदारी मुख्यमंत्री यांची आहे. शरद पवार यांचे राजकारण ओबीसी यांच्या जीवावर आहे. जरी विरोधी पक्षात पवार असले तरी, त्यांनी व्यक्त झाले पाहिजे. अशी भूमिका हाके यांनी मांडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यात न्यायमूर्ती शिंदे समितीने ८ लाख कुणबी यांना ओबीसी दाखले वाटले असल्याचा दावा केला आहे. याचा २ कोटी कुटुंबांना लाभ होतो आहे. अशा परिस्थितीत ओबीसी डी.एन.ए असणारा भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी आरक्षणाला कसा धक्का लागत नाही, यांचे उत्तर फडणवीस यांनी द्यावे. तसेच काल परवा, संदीपान भुमरे, उदय सामंत हे जरांगे पाटील यांना कशाला भेटायला गेले होते. या भेटी नंतर जरांगे यांनी आंदोलनाची घोषणा कशी केली. अशा प्रश्नांची उत्तरे फडणवीस यांनी द्यावी. अन्यथा ज्या दिवशी शिंदे समितीचा अहवाल सरकार स्वीकारेल. त्याच्या दुसऱ्या दिवशी ओबीसींच्या न्याय हक्कासाठी राज्यभर आंदोलन उभा केले जाईल. वेळप्रसंगी मंत्र्याच्या घरासमोर बसून आंदोलन करू. असा इशाराही ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

### वाल्मिक कराडचा मुक्काम असलेलं बीड कारागृह पुन्हा चर्चेत, जेलमध्ये क्षमता १६० ची अन् कैदी ३२०, एका बराकमध्ये ४० कैद्यांना ठेवण्याची वेळ

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणातील मोक्का आरोपी वाल्मिक कराड व त्याच्या टोळीमुळे, तसेच आर्थिक घोटाळ्यांतील आरोपी सुरेश कुटे, बबन शिंदे आणि सतीश ऊर्फ 'खोक्या' भोसले यांच्यामुळे बीड जिल्हा कारागृह गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आले आहे. त्यातच एका अधिकाऱ्यासह एका महिला शिपायाला निलंबित करण्यात आल्यामुळे हे कारागृह पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. आता बीडच्या जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याचे समोर आले आहे.

### व्यक्ती कितीही मोठ्या पदावर असले तरीही असंवेदनशील बोलू नये

वडेट्टीवार यांच्या माफीवर चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विजय वडेट्टीवार यांनी असंवेदनशील आणि देशातील जनतेच्या भावना दुखावणार वादग्रस्त वक्तव्य केलं आहे.अशा वक्तव्याला माफी मागून होणार नाही. मीडियाचा स्पेस घेण्यासाठी बोलायचे मात्र, आपल्या बोलण्याने समाजात काय परिणाम होईल. या घटनेत ज्या लोकांचे परिवार उध्वस्त झाल त्यांच्यावर काय परिणाम होईल. कार्य करणाऱ्या यंत्रणांवर काय परिणाम होईल.व्यक्तीने कितीही मोठ्या पदावर असले तरीही असंवेदनशील बोलू नये. असे मत पडेंटीवार यांच्या माफेवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त करीत आपली प्रतिक्रिया दिली. यावेळी ते म्हणाले की, या वक्तव्यामुळे काँग्रेस पार्टीचा चेहरा आणि यांच्या देशाबद्दल आणि व्यक्तीबद्दलच्या भावना यातून दिसते. त्यामुळे पुढच्या काळात जनता यांना सोलून काढल्याशिवाय राहणार नाही. असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त करीत विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा समाचार घेत काँग्रेसवर सडकून टीका केली.

### कॉमनवेल्थ घोटाळा प्रकरणात सुरेश कलमाडींना क्लीन चीट

**पुणे/प्रतिनिधी :** काँग्रेसचे माजी मंत्री सुरेश कलमाडी यांना कॉमनवेल्थ भ्रष्टाचार प्रकरणात ईडीकडून क्लीनचीट दिल्याने कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. २०१० साली कॉमनवेल्थ घोटाळा झाल्याचे सुरेश कलमाडी यांच्यावरती राजकीय आरोप झाले होते. त्यानंतर सुरेश कलमाडी यांचं राजकीय अस्तित्व संपलं. मात्र, तब्बल १५ वर्षांनी हा क्लोजर रिपोर्ट न्यायालयात सादर केला आहे. ईडीकडून न्यायालयामध्ये या प्रकरणातला क्लोजर रिपोर्ट सादर केल्यानंतर पुण्यात कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात येत आहे.

पंधरा वर्षे जुन्या प्रकरणावर पडदा टाकत दिल्ली न्यायालयाने काल (सोमवारी) २०१० सालच्या कॉमनवेल्थ घोटाळा (राष्ट्रकुल स्पर्धांच्या) आयोजन समितीचे माजी प्रमुख सुरेश कलमाडी, तत्कालीन सरचिटणीस ललित भानोत व इतरांविरुद्ध मनी लॉड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाचा (ईडी) क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे.

# लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होऊ नये, माझी भूमिका स्पष्ट आहे : विजय वडेट्टीवार

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** माझं वक्तव्य मागून पुढून न दाखविता तोडून मोडून दाखवण्यात आले.देशांमध्ये कारस्थान रचण्याचा प्रयत्न केला. आमची भूमिका स्पष्ट आहे. मल्लिकार्जुन खर्गे यांनी जी भूमिका मांडली ती आमच्या पक्षाची भूमिका आहे. असे मत विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

ते म्हणाले की, नितेश राणे यांनी काय म्हटले त्याकडे मला लक्ष देण्याची गरज नाही. काल मी जे बोललो ते तोडून मोडून दाखविण्यात आले.भारताला आपापसात लढविण्याचा षडयंत्र पाकिस्तानने रचले आहे. पहिल्यांदा दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळीबार केला.सरकार आपले अपयश लपविण्यासाठी माझे



वक्तव्य तोडमोड करून दाखविले गेले. माझं वक्तव्य मागून पुढून न दाखविता तोडून मोडून दाखवण्यात आले. देशांमध्ये कारस्थान रचण्याचा प्रयत्न केला. आमची भूमिका स्पष्ट आहे. मल्लिकार्जुन खर्गे यांनी जी भूमिका मांडली ती आमच्या पक्षाची भूमिका आहे.

मी काल बोललो की अतिरेक्यांना पहिल्यांदा एवढा वेळ मिळाला त्यांनी धर्म विचारून गोळीबार केला. तेवढेच दाखविण्यात आला माझी चॅनलला विनंती आहे. माझे पूर्ण वक्तव्य दाखवा. देशाच्या सर्वभौमतेला, अखंडतेला खिंडार पाडण्यात त्यांना यश मिळवायचं होतं त्यामुळे त्यांनी असा कट रचला आहे.अतिरेक्याला कुठला धर्म नसतो असं मी बोललो हा भारताला कमजोर करण्याचा हल्ला होता.२६ वर्षानंतर पर्यटकांवर झालेला हल्ला आहे. हे अपयश लपविण्यासाठी माझं बोलणं तोडून मोडून दाखवले आहे.ज्या निष्पाप लोकांचा बळी गेला माझ्या बोलण्याने त्यांच्या भावना दुखावले असतील कुटुंबांना वेदना झाला असेल तर मी माफी मागतो. मीडियाला माझी विनंती आहे माझं भाषण पूर्ण दाखवा अर्धवट भाषण दाखवून सरकारचा अपयश लपवू नका, लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होऊ नये, माझी भूमिका स्पष्ट आहे. अतिरेकी पहिल्यांदा धर्म विचारतात, अतिरेक्यांना इतका वेळ मिळाला दोन धर्मात भांडण लावले जात हे पहिल्यांदा केले जात आहे.नाशिक पालकमंत्री पद याचा पक्षाचा अंतर्गत वाद सगळं आलबेल आहे. असे मी म्हणणार नाही,अमित शाह येऊन गेले. पण तोडगा निघाला नाही, तीन तिघाडा काम बिघाडा सुरू आहे. परस्पराविरोधात वक्तव्य केली जात आहे. सरकार म्हणून महाराष्ट्रात एकत्रित काम करताना दिसत नाही.याचा अर्थ स्पष्ट आहे की, त्यांना जनतेशी काही देणंघेणं नाही.त्यांना सत्ता खुर्चीसाठी भांडण आहेत. आणि त्यासाठी ते भांडत आहेत. शिक्षक भरती तपासता ईडी चा प्रवेश झाल्याची बातमी मी वाचली. उच्चस्तरीय न्यायालयीन समिति नेमून याची चौकशी व्हावी केवळ एकाला अटक करून ही चौकशी होणार नाही. यात दोषी आहेत, त्या दोषींवर कारवाई व्हावी अशी आमची मागणी आहे. असे मत आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### जूनच्या पहिल्या आठवड्यात आम्ही मोठी रॅली काढणार : माजी मंत्री बच्चु कडू



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** पहिली बारामती येथे मोठी सभा घेऊन ही रॅली एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात आणि सर्व मंत्र्यांच्या घेरत सहा दिवसाचा प्रवास करून शेवटी नागपुर पोहचणार आहे.अशी माहिती माजी मंत्री बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी बोलताना माजी मंत्री बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांचा आणि दिव्यांग्याच्या मागण्यांना घेऊन ही रॅली असणार आहे. देवेंद्र फडणवीस जे बोलले ते दिले पाहिजे. दिले नाही तर आम्ही हटणार नाही, १४ तारखेला प्रत्येक मंत्र्याच्या घरासमोर रक्तदान शिबिर घेणार आहे. शेवटच्या दिवशी किमान ३० हजार शेतकरी रक्तदान करतील. रक्त घ्या पण सांडवायची वेळ येऊ देऊ नका हे सांगण्याचा प्रयत्न करु, त्यानंतर महाराष्ट्रभर किमान २ हजार सभा घेऊन जनआंदोलन पेटविणार आहे. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन देखील कारवाई होत नसल्याने आंदोलन करण्याची वेळ आली आहे. नागपूरला नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री आहे. भाजपाचा सरकार चालवणार संघाच मुख्यालय देखील येथील असल्याने नागपूरची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिली.

### पुसद येथे मुलगी युपीएससी उत्तीर्ण झाल्याच्या आनंदात वडिलांचा हृदयविकाराने मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिद्द व चिकाटीने युपीएससी परीक्षा मुलगी उत्तीर्ण झाली. सर्वत्र आनंदाचे वातावरण असतानाच वडिलांचा हृदयविकाराने मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना पुसद येथे घडली. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.सेवानिवृत्त विस्तार अधिकारी प्रल्हाद दत्ता खंदारे, असे निधन झालेल्या अभागी वडिलांचे नाव आहे. मोहिनी खंदारे ही नुकतीच कठीण समजली जाणारी युपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाली. यात ८४४ वी रँक मिळाली. खंदारे परिवारात आनंदाचे वातावरण पसरले. त्यांनी आपले मुळगाव महागाव तालुक्यातील माळवागद येथे पेढे वाटून आनंद साजरा केला. हर्षोल्हसात असतानाच अचानक प्रल्हाद खंदारे यांच्या छातीत दुखू लागले. त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रमिलाबाई, युपीएससी परीक्षा उत्तीर्ण मुलगी मोहिनी खंदारे, न्यायाधीश मुलगा विक्रांत व न्यायाधीश सून स्वाती, असा बराच मोठा आप्त परिवार आहे. पुसदच्या मोक्षधामात त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ईडी ने स्वतःच आपले कार्यालय जाळून टाकले - काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** इ.डी. ने आपले स्वतःचेच कार्यालय जाळून घेतले. अश्या कडक शब्दात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबई चे इडी



कार्यालयाला आग लागली. यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. दहा वर्षात विरोधकांना जेरीस आणण्याकरिता विरोधकांना जेल मध्ये टाकण्यासाठी विरोधकांना त्रास देण्यासाठी त्यांना पक्षांतर करण्यास बाध्य करण्यासाठी या कार्यालयाचा उपयोग झाला आहे. आता त्यांचे विरोधात कुठलेच पुरावे नाही. हा कांगावा करण्यासाठी इडी ने आपले कार्यालयच जाळून टाकले. अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

### पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील



हे बुधवार व गुरुवार दि. ३० एप्रिल व १ मे रोजी दोन दिवसीय बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. ३० एप्रिल रोजी मुंबई येथून बुलढाणा येथे आगमन व मुक्काम. गुरुवार दि. १ मे रोजी नियोजित कार्यक्रमांना उपस्थिती व दुपारी २ वाजता मुंबईकडे रवाना होतील.

# राज्य महामार्गावरील शौचालयाच्या दयनीय अवस्था

## महिलांची प्रचंड कुचंबना, डोणगाव येथील प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव हे परिसरातील सर्वात मोठे गाव वजा शहर आहे. तसेच परिसरातील तब्बल ३२ गावाची मुख्य बाजारपेठ आहे. त्यामुळे या ठिकाणी दर दिवशी हजारो नागरिक तथा महिलांची विविध कामासाठी येजा सुरू असते. मात्र,येथील राज्य महामार्गावरील महिला मुत्री घराची दयनीय अवस्था झाल्याने महिलांना कुचंबना होत आहे.

डोणगाव चे शहर छत्रपती संभाजीनगर ते नागपूर राष्ट्रीय महामार्गावर असल्याने या गावाचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे. त्याचबरोबर परिसरातील तब्बल ३२ खेड्यातील महत्त्वाचे गाव व मुख्य बाजारपेठ असल्याने या ठिकाणी दर दिवशी हजारो नागरिकांची येजा सुरू असते. डोणगाव येथील लोकसंख्या जवळपास ३० हजाराच्या जवळपास आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाते आणि तेवढ्याच मोठ्या प्रमाणात या गावाच्या विकासासाठी शासनाकडून निधी सुद्धा उपलब्ध होतो. मात्र, स्थानिक प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गावाचा विकास अत्यंत संथ गतीने चालू असल्याचे दिसून येत आहे. राज्य महामार्गावर असलेले महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नसल्याने व आहे त्या शौचालयाची अत्यंत दुरावस्था झाली असल्याने महिलांची कुचंबना होताना दिसून येत आहे. एकीकडे शासन भारत स्वच्छ व सुंदर अभियान राबवत आहे. गावागावात शौचालयासाठी एक दिवस वापरण्यासाठी स्वच्छ भारत मिशन सारखी योजना राबवली जात आहे. असे असताना मात्र, डोणगाव येथील स्वच्छ भारत मिशनचा बोजवारा उडाला आहे. याकडे स्थानिक प्रशासनाचेही दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.






### महिलांच्या मुतारी घरासमोर खड्डा व घाणीचे साम्राज्य

येथील राज्य महामार्गावर असलेल्या महिला स्वच्छता गृहाचे तथा मुतारी घराची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असून येते मुतारी घरासमोर प्रचंड मोठा खड्डा पडलेला आहे. त्या खड्ड्यामध्ये घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून यामुळे दुर्गंधी पसरली जात आहे. या दुर्गंधीमुळे आजुबाजुला वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.येथील मुतारी घरांची अत्यंत दयनीय अवस्था असताना स्थानिक प्रशासनाचे मात्र, याकडे चक्क दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र रोष केला जात आहे. याकडे स्थानिक प्रशासनाने लक्ष देऊन आणि ते मुतारी घराची स्वच्छता करावी त्याचबरोबर नव्याने स्वच्छतागृह उभारवे, अशी मागणी महिलांकडून होत आहे.

### तब्बल ६०५ किलो गांजासह ४२ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल ६०५ किलो गांजा जप्त केला असून, त्याची किंमत ४२,३५,००० रुपये एवढी आहे. ही कारवाई शिरपूर तालुक्यातील चिलारे गावाच्या शिवारात टिटवा गावाच्या रोडवरील शेतात करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, रविंद्र गणेश पावरा (रा. चिलारे, ता. शिरपूर) याने मोठ्या प्रमाणात आपल्या शेतात अंमली पदार्थाचा साठा केला असल्याची माहिती मिळताच त्यांनी शिरपूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांच्या सहकार्याने दोन पथक तयार करीत पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली छापा टाकत धुळे एलसीबी व शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या मदतीने ही कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेत सदर आरोपी विरोधात शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

### अंबड परिसरात असलेल्या कामटवाडा येथे एका १७ वर्षीय मुलाची हत्या, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या अंबड परिसरात असलेल्या कामटवाडा येथे एका १७ वर्षीय मुलाची हत्या झाल्याची घटना काल दुपारच्या वेळेस झाली होती. यात पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे.



अल्पवयीन मुलांच्या टोळ्यांमध्ये वादाचा भडका उडाला आणि काल दुपारी २ वाजता कामटवाड्यात करण चौरे या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. आठ दिवसांपूर्वीच तो बाल सुधारगृहातून सुटून आला होता.८ मार्चला संत कबीरनगरात अरुण बंडी याचा करण चौरेसह सहा संशयितांनी दगडाने ठेचून खून केला होता. त्याचा बदला घेत बंडीच्या गँगमधील चिमण्या आणि सहा साथीदारांनी त्याच पद्धतीने करणला डोक्यात दगड घालून संपवले. याप्रकरणी अंबड पोलिसांनी चिमण्या उर्फ महेश सोनवणे, सुमित बगाटे या संशयितांसह चार अल्पवयीनांना ताब्यात घेतले. असून सर्व संशयित आपापल्या परिसरात भाईगिरी करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. अरुण बंडी याचा ८ मार्चला संत कबीरनगरात डोक्यात दगड घालून खून झाला होता. त्याचा बदला घेण्यासाठी त्याच प्रकारे करणचा खून करून घेण्यात आला.

# नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

## ई-केवायसी व आधार सीडिंग बँक खात संलग्न करा - कृषी विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता आणि राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा ७ वा हप्ता जुलै २०२५ च्या अखेरीस शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित केला जाणार आहे. परंतु जिल्ह्यातील ४ हजार २९० शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि ४,७०५ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग( ) अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना सन्मान निधीपासून वंचित राहू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि आधार सीडिंग बँक खात्यांशी संलग्न करुन घ्यावे, असे आवाहन कृषि विभागाचे कृषि उपसंचालक अनुराधा गावडे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र शासनाकडून वार्षिक सहा हजार रुपये आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक असून बँक खात्याशी किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकमध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करण्याचे काम तत्काळ पूर्ण करून घ्यावे. यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक, गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. मनोजकुमार ढगे बुलढाणा यांनी केले आहे.

# बालविवाह रोखण्यासाठी खबरदारी घ्या

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अक्षयतृतीया दिवशी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सामूहिक बालविवाह होतात, याची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठी संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ लागू असून याचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू आहेत. या अधिनियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी, तर ग्रामीण भागासाठी ग्राम पंचायत अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच ग्रामीण भागाकरीता अंगणवाडी सेविका, तसेच शहरी भागाकरिता पर्यवेक्षिकांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

ग्रामिण व शहरी भागात आपल्या अधिकार क्षेत्रात बालविवाह होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. बालविवाह होत असल्याचे लक्षात आल्यास त्यावर तातडीने आवश्यक ती कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्यातील विशेष बाल पोलीस पथक किंवा आपल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या पोलीस स्टेशन अंतर्गत नियुक्त बाल कल्याण पोलीस अधिकारी, सहाय्यक बालविवाह प्रतिबंध अधिकारी, अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षीका, बाल कल्याण समिती, चाईल्ड लाईन (१०९८), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, गावस्तरावर ग्राम बाल संरक्षण समिती, तालुका स्तरावर तालुका बाल संरक्षण समिती यांचे सहाय्य घेण्यात यावे.

गावस्तरावर बाल विवाहाला प्रतिबंध घालण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृती कार्यक्रम, उपाययोजनात्मक बैठका, रॅली, माहिती पत्रके वाटप इत्यादी कार्यक्रम घेवुन जनतेला बालविवाह सारख्या अनिष्ठ विरुध्द जागृत करण्याचे काम करण्यात यावे. तसेच बालविवाहत सहभागी होणारे धार्मीक गुरु, पंडित, सेवादाते, लग्न मंडपवाले, फोटो व व्हिडीओ शुटींगवाले, कॅटरिंगवाले, लॉन्स मालक, वाजंत्री यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी सूचना द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.



बालविवाहास चालना देणारी कृती करणारे, विधीपुर्वक लावण्याची परवानगी देणारे किंवा तो विधी पुर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यास हलगर्जी व कसुर करणारे, यामध्ये उपस्थित राहणारे किंवा त्यामध्ये सहभागी होणारे व्यक्ती यांचाही समावेश होतो. अशा व्यक्तींना दोनवर्षापर्यंत असु शकेल इतक्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयापर्यंत दंड असु शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस देखील पात्र असणार आहेत. त्यामुळे बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी सरपंच, ग्राम बाल संरक्षण समित्या, शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, यांच्या मदतीने संभाव्यीत बालविवाह घटनांना प्रतिबंध करुन समाज विघातक ठरणाऱ्या बालविवाह साऱख्या कुप्रथेला सहाय्य करणाऱ्या व बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ या कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदयानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.